# महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई

मुंबई सा.बां.प्रादेशिक विभाग, मुंबई

अधीक्षक अभियंता, रत्नागिरी

सा.बां.मंडळ, रत्नागिरी

कार्यकारी अभियंता

सार्वजनिक बांधकाम विभाग चिपळूण

ता.चिपळूण

## नागरिकांची सनद

# सूची


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | विभागीय कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | ६ |
| ३ | विभागीय कार्यालयाची रचना | ८ |
| ४ | विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र | ११ |
| ५ | विभागीय कार्यालयांतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण | १२ |
| ६ | विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते व सुरक्षितता | १४ |
| ७ | गा-हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी | १५ |
| ८ | सनदेची अंमलबजावणी व प्रतिसाद | १७ |
| ९ | परिशिष्टे | १८ |

## १ प्रस्तावना :-

**५२** वर्षाची गौवरशली परंपरा असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत गेल्या तीस वर्षापासून यशस्वीपणे कार्यरत असलेला व कोकणाचे नाते मुंबई या आर्थिक व सांस्कृतिक राजधानी असलेल्या नगरीशी जोडून, परशुराम भुमितील कोकणातील नागरिकांच्या विकासाला भव्य प्रवेशव्दार खुले करणारे सा.बां.विभाग चिपळूण हे महत्वाचे कार्यालय आहे. कोकणातील नागरीकांच्या तत्पर सेवेकरीता नेहमीच कटीबध्द असलेले सा.बां.विभाग चिपळूण, मुंबई गोवा या राष्ट्रीय महामार्गावरील चिपळूण येथील प्रसिध्द बहादुरशेख नाक्याजवळ 'बांधकाम भवन' या वास्तुत कार्यरत आहे. २००३ मध्ये या विभागास आय.एस.ओ. मानांकन मिळाले असून ही बांधिलकी सा.बां.विभाग चिपळूण या सनदेव्दारे जाहीर करीत असून ती स्विकारत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारीत केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपुर्वक व सन्मानपूर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न योग्य तऱ्हेने हाताळून व तत्परतेने सोडविण्याचा या विभागाचा दृष्टीकोन आहे. व बांधकाम विभागाविषयीचे हक्क व सोयी सुविधा सर्वसामान्य नागरीकांपर्यंत अतिशय सुलभतेने पोहचविण्याचा ध्यास या विभागास लागला आहे.

**सा.बां.विभाग चिपळूण या विभागाने जिल्हयाचा विकास, प्रगती व नागरिकांचे प्रश्न याचा विचार करुनच ही सनद तयार करण्यात आली आहे.**

१ आपल्या भारत देशाची धमणी समजणारे व या विभागाच्या कार्यक्षेत्रात येणारे किनारी महामार्ग, राज्य महामार्ग अतिशय उत्तम दर्जाचे करणे.

२ रस्ते विकास योजनेतील या विभागाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची नवीन बांधकामे, सुधारणा तसेच त्यावरील मोठे पूल, लहान, पुल, मो-या व साकव यांची बांधकामे ,उत्तम दर्जाची सुरक्षीत अशी करणे

३ या विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या इमारती,रस्ते व पूलांची नियतकालीक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणा-या निधीतून प्रभावीपणे करणे व सेवा व सुविधांचा स्तर उंचावत नेणे

४ या विभागाशी संलग्न असलेल्या इतर शासकीय विभागांना तांत्रिक सल्ला देणे व शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवणे

५ या विभागांतर्गत असलेल्या सर्व उपविभागांच्या अखत्यारीतील ठेकेदारांची नोंदणी प्रमाणपत्रे व विविध नाहरकतींचे दाखले विहीत कालावधीत निर्गमीत करणे

६ याविभागात व विभागाच्या अखत्यारीतील सर्व उपविभागात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे

७ आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने अभियांत्रिकीशी संबंधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे

८ या विभागात व विभागाच्या अखत्यारीतील सर्व उपविभागातून कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहीररीत्या प्रदर्शित करणे.

९ या विभागात व विभागाच्या अखत्यारीतील सर्व उपविभागात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी/तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे

१० माहीतीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या विभागा अंतर्गत मागीतलेली माहीती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणेबाबत समक्ष स्तरावर तत्पर कार्यवाही करणे

११ कार्यालयांच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून या विभागाची व सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे

१२ संगणीकरणाबाबत हया विभागां अंतर्गत उपविभागाना अवगत करणे व नेटवर्कला जोडणे प्रादेशिक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्कव्दारे आवश्यक व तातडीची माहीती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रश्त्नशील रहाणे.

१३ या विभागांतर्गत आवश्यक व अद्यावत विहीत माहीती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे

१४ सर्व विषयांची अनुसूची तयार करणे व निपटारा करणेचा विहीत कालावधी ठरविणे.

१५ कार्यालयामध्ये राजीव गांधी अभियांना अंतर्गत सर्व अभिलेख अद्ययावत करणे व त्यांची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्ययावत करणे.

१६ या विभागाच्या कामकाजात पारदर्शकता व सुसुत्रता आणणे व गतिशील प्रशासकीय कामकाजाचा अवलंब करणे.

१७ या विभागात व विभागाच्या अखत्यारीतील सर्व उपविभागामध्ये अतिशय सौजन्यपूर्ण सेवाभावी व उत्साही वातावरण ठेवणे.

१८ दैनंदिन कामकाजात आधुनिकता, गतिमानता व गुणवत्ता आणणेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रतिमा उज्ज्वल करणे.

१९ नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

२० रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अनेक स्थळे पर्यटन स्थळे म्हणून जाहिर केली आहेत. शासनाच्या पर्यटन धोरणास अनुसरुन अशी स्थळाशी संबधीत रस्ते इमारती, मोऱ्या इ. बांधकामे उत्तम दर्जाची तयार करुन पर्यटकांना सोयी सुविधा उबलब्ध करुन देणे

२१ विशेष घट योजनेअंतर्गत अनुसुचित जाती जमाती वाडयावस्तीत जोडणारे साकव बांधकामे करणे

२२ महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामीण लोकांना दारिद्र्य रेषेखाली असलेल्या लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी रस्त्याची कामे सुरु करणे.

२३ निर्मल ग्राम योजनेअंतर्गत स्वच्छता अभियान राबविणे अंतर्गत सर्व कार्यालयांना स्वच्छतेच्या सुविधा पुरविणे.

२४ १०० कोटी वृक्ष लागवड योजने अंतर्गत सोयीनुसार जागेच्या उपलब्धतेप्रमाणे वृक्ष लागवड करणे

२५ जिल्हयामध्ये बहुउद्देशीय कंपन्या उदा.गेल इंडिया,एरटेल,भारत संचारनिगम,यांना दुरध्वनी केबल टाकणेसाठी परवाग्या देणे.

२६ इमारतीचे भाडे प्रमाणप्रत्रे,मुल्याकन नाहारकत दाखला इत्यादी प्रमाणप्रत्रे देणे.

२७ न्यायालय,पोलीस,वैद्यकीय,तंत्रशिक्षण,सामाजिक न्याय विभाग ,आदिवासी प्रकल्प विभाग,कृषी विभाग व दुग्ध व्यवसाय विभागाच्या इमारतीचे बांधकाम करणे तसेच देखभाल व दुरुस्ती करणे.

# २ या विभागीय कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी

**१ विभागीय कार्यालयाची बांधिलकी --**

वरील सर्व कर्तव्य पार पाडताना सा.बा. विभाग चिपळूण ता.चिपळूण

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपूर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे/प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

**२ नागरिकांची जबाबदारी**

- शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.
- नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.
- नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
- विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.
- सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
- नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत
- रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणा-या वृक्षराजींचे जतन ही नागरिकांचीसुध्दा जबाबदारी राहील
- नागरिकांची कायदेशीर तरतूदी, नियम अलिखीत संकेत यांचे पालन करावे.
- नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

# 3 सा.बां.विभाग चिपळूण, मु.चिपळूण कार्यालयाची रचना

**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाची सर्व कार्यप्रणाली सचिव बांधकाम व रस्ते यांचे नियंत्रणाखाली चालते त्यांना मदतनीस उपसचिव रस्ते व पूल है विभाग आहेत.**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक स्तरावरील मुख्य अभियंता हे सर्वोच्च तांत्रिक अधिकारी असून त्यांचे मुख्यालय मुंबई या ठिकाणी आहे. मुंबई प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंत्यांचे अखत्यारीत जयस्तंभ रत्नागिरी येथे अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, रत्नागिरी येथे कार्यालय आहे.

रत्नागिरी जिल्हयातील राज्यक्षेत्राकडील कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां.विभाग चिपळूण हे कार्यालय चिपळूण येथे आहे

कार्यकारी अभियंता यांचे अधिपत्याखाली एकूण ६ उपअभियंते कार्यरत असन सर्वसाधारणपणे उपअभियंत्यांकडे तालुक्याचे कार्यक्षेत्र आहे. कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांची मुख्यालये दर्शविणारा वृक्षतक्ता सोबत जोडला आहे. (परिशिष्ट-अ)

कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग हा ख-या अर्थाने माहितीचा स्त्रोत असतो. कठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरुवातीपासून अशी संबंधीत कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात मिळू शकते. कार्यकारी अभिंयता है जिल्हा स्तरीय नियंत्रक आधिकारी म्हणून काम करतात.

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. हया विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां.नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेली निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादींचे कोटकोरपणे पालन क्षेत्रिय अधिका-यांकडून केले जाते.

या विभागास अय एस ओ दर्जा ९००१-२००० असा दर्जा प्राप्त झालेला आहे

# ४ विभागाचे कार्यक्षेत्र

या विभागाचे कार्यक्षेत्र रत्नागिरी जिल्हयात असून एकूण ६ तालुक्यात विखुरलेले आहे.  या विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत प्रमुख राज्य मार्ग क्र.४ (सागरी महामार्ग) १०८.७२० कि.मी. असून ऐकूण राज्यमार्ग ,३५१.८८० कि.मी.व प्रमुख जिल्हा मार्ग यांची एकूण लांबी ३००.१२० कि.मी. एवढी आहे. तसेच देखभाल दुरुस्तीकरीता असलेल्या निवासी इमारतींचे १८१८९.८४चौ.मी.व अनिवासी इमारतींचे ४१००९.५२ चौ.मी. जोते क्षेत्रफळ आहे.

# ६ विभागांतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण

**अ) कार्यपूर्तीचे वेळापत्रक**

सा.बां.विभाग चिपळूण, मु.चिपळूण कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील ठेकेदारांची नोंदणी, विविध ना हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी लागणारा कालावधी, त्यास सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती तसेच रस्ते, पूल व इमारती आणि इतर कामांविषयाची माहिती कार्यपुर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट-ब) नमुद केली आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे यांची माहिती विहीत फी भरुन संबंधित कार्यालयाला मिळू शकेल.

नैसर्गिक आपत्ती कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ.उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपुर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

**ब) माहितीची सुलभता**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) वेळोवेळी सादर केल्या जाणा-या विभागीय कार्यालयाच्या माहितीचा तपशील व आकडेवारीचा तपशील जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

**क) खाजगीकरण**

विशेषतः शहरी भागाच्या विकास कामांसाठी व मोठया प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पातून उपलब्ध होणारा अल्प निधी व काळाची गरज, या कारणांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने विकास कामांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग "बांधा वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर सुरु केला आहे. यामुळे ग्रामीण भागाकडे अधिक विकास निधी उपलब्ध करणे शक्य होणार आहे. कार्यक्रमाची परिणामकारक, जनतेचे अभिप्राय इत्यादीचा अभ्यास करुन पुढील दिशा व धोरण शासन स्तरावर ठरविले जाईल.

# ६ सा.बां.विभाग चिपळूण , ता.चिपळूण कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी अपघात निवारण समिती स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

अपघात निवारण समितीने या विभागाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करुन सुचविलेल्या अपघात प्रवण स्थळांची सुधारणा व उपाययोजना टप्प्या-टप्प्याने हाती घेण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने १७२ अपघात प्रवण स्थळे समितीने सुचविली असून त्यापैकी प्राधान्यक्रमाने ८१ अपघात प्रवण स्थळांची सुधारणा विभागीय कार्यालयाने केली आहे व ९१ स्थळांची सुधारणा टप्प्या-टप्प्याने हाती घेण्यात येणार आहे. या विभागांतर्गत रस्ते सुरक्षिततेवर भर देण्यात येत असून तपशीलवार व आवश्यक असे माहिती फलक रस्त्यांवर लावण्यात येत आहेत, जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचा-यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित ठेवण्याचा मानस आहे.

# ७ गा-हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी सुरक्षितता

**अ) गा-हाणी/ तक्रारी यांचे निराकरण**

विभाग / उपविभागाबाबत अथवा काही कामाबाबत गा-हाणे/तक्रार असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदा.उपविभागीय कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रारी असल्यास विभाग कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे, व विभागीय कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रारी असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंतक्यांकडे गा-हाणे मांडावे. मंडळ कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रार असल्यास मुख्य अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे. अशा गा-हाणी/तक्रारीचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसात करण्यात येईल. गा-हाणी/तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र पेटी ठेवण्यात येईल.

गा-हाणी समक्ष भेटीत /पत्राने वा ई-मेलव्दारेही नागरिक मांडू शकतात.

**ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन**

या विभागाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्तता तथा परिणामकारकतेचा आढावा घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

**क) जनसामान्यांकडून सूचना**

या विभागाची नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सुचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेसीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

# ८ नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत या विभागीय कार्यालयाच्या या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दिनांक १/१/२०११ पासून करण्यास विभागीय कार्यालय कटिबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/ अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

सा.बां.विभाग चिपळूण, मु.चिपळूण खात्रीपुर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. या विभागाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील, सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. ग्राहक केंद्रिच सेवेची उद्दिष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशिर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल.

प्रशिक्षित व प्रोत्साहित कर्मचारी वर्गाव्दारे ग्राहकांना सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल व तक्रारशून्य सेवा असल्याची खात्री करण्यात येईल

# ९ परिशिष्टे

अ) मुख्यालय दर्शविणारा वृक्षतक्ता

ब) कार्यपूर्तीचे वेळापत्रक

क) कार्यक्षेत्राचा नकाशा


# परिशिष्ट-ब

## कार्यपुर्तीचे वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यसुची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपुर्तीचा कालावधी/मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | कंत्राटदार वर्ग १ अ, १ ब, १ क, २ व ३ यांची नोंदणी व नुतनीकरण | सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई | ७५ दिवस |
| २ | कंत्राटदार वर्ग ४ व ४ (अ) नोंदणी व नुतनीकरण | मुख्य अभियंता, क्षेत्रिय कार्यालय | ६० दिवस |
| ३ | कंत्राटदार वर्ग ५,६ आणि बेरोजगार अभियंतांचे नोंदणीकरण व मजूर सहकारी संस्था वर्ग अ यांचे वर्गीकरण व नुतनीकरण | अधीक्षक अभियंता | ३० दिवस |
| ४ | कंत्राटदार वर्ग ७,८,९ आणि मजूर कामगार सहकारी संस्था वर्ग ब यांचे वर्गीकरण, इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे वर्ग ७ मध्ये नोंदणीकरण व नुतनीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ५ | विश्रामगृहाचे आरक्षणपत्र | कार्यकारी अभियंता | ७ दिवस शिवाय ऑनलाईन आरक्षणही उपलब्ध |
| ६ | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ७ | पेट्रोल पंप आणि पेट्रोल पंपाच्या पोहोच मार्गाचे ना हरकत प्रमाणपत्र | शासन | ६० दिवस |
| ८ | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र | मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्गासाठी व अधिक्षक अभियंता इतर मार्गासाठी | ३० दिवस |
| ९ | चलतिचत्र गृहाचे योग्यता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १० | सरकारी इमारतींचे ना उपलब्धता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| ११ | सरकारी निवासस्थान न मिळण्याचे प्रमाणपत्र (अनुलब्धता) | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |
| १२ | सरकारी निवासस्थान मिळण्याबाबतचे प्रतिक्षा यादी क्रमांक | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |
| १३ | सरकारी निवासस्थानी राहणा-या निवृत्त कर्मचा-यांच्या बाबतचे ना हरकत दाखले | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| १४ | इमारतींच्या भाडयाचे निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १५ | इमारतींचे मुल्य निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |

टिप -- सर्व वर्गाच्या नोंदणी व नुतनीकरणासाठी अर्ज कार्यकारी अभियंता यांचेकडे स्विकारण्यात येतात.

# परिशिष्ट-अ




D:\dongare\for mail\Copy of Sanad-7cpn/all